# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

**(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)**

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १३८४/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. दिनकर चंद्रभान सावरकर, जय सोमनाथ पॅलेस-३, प्लॉट नं. ८९/९१, पारेख लेआऊट, द्रोणाचार्य नगर, त्रिमुर्तीनगर, नागपूर-२२. | पोलीस उपअधिक्षक(गृह), पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा, ता.जि. भंडारा | अपर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा, ता.जि. भंडारा |

**सुनावणी दिनांक :- १८.१२.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित (प्रतिनिधी)** | **अनुपस्थित** | **उपस्थित (प्रतिनिधी)** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : दि. २३.०५.२०२२

(२) द्वितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. २३.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अद्याप पर्यंत माहिती प्राप्त न झाल्याने.

(४) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : दि. ११.११.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. ११.११.२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : --

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : १) स्था. गुन्हे शाखा अंतर्गत असलेले सायबर सेल विभागास एका व्यक्तीने मागणी केल्यास एखादया व्यक्तीचे मोबाईल लोकेशन, सि.डी.आर, एस.डी. आर. देण्याचे अधिकार आहेत का? असल्यास आदेशाची साक्षांकित प्रत दयावी, २) पोलीस अधिक्षक भंडारा किंवा मा. जिल्हा न्यायालय, भंडारा यांचे ए.एस.आय. मेहेर यांना मो.न.

९९२३५९३१३०/ ९४२१७०९८५३/ ९४२२१३१२४६ या मोबाईल नंबरचे लोकेशन सि.डी.आर., एस.डी.आर. देणेबाबत सायबर सेल ला आदेश दिले होते काय असल्यास साक्षांकित प्रत, ३) ए.एस.आय. अश्विनकुमार मेहेर, यांना मो.न. ९९२३५९३१३०/९४२१७०९८५३/ ९४२२१३१२४६ चे लोकेशन सि.डी.आर., एस.डी.आर., पुरविण्यात आले आहेत का असल्यास त्या पत्रावर कोणत्या अधिकाऱ्याने स्वाक्षरी केलेली आहे. ते संपूर्ण कागदपत्रे साक्षांकित प्रती.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक १४.१२.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्र.पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा यांनी अपीलार्थीस मागितलेल्या मुद्दा क्र. १ च्या माहितीबाबत सदर माहिती ही वरिष्ठांचे आदेशाने देण्याचे अधिकार असून अशा प्रकारचे आदेशाची प्रत कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नाही, असे कळवून मुद्दा क्र. २ व ३ बाबत कलम ८(१)(त्र) अन्वये सदरची माहिती नाकारण्यात येत आहे, असे कळविले आहे.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : दि. ११.०१.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. ११.०१.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती नाकारली आहे.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक १८.०२.२०२२ रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह) भंडारा यांनी मुद्दा क्र.१ बाबत संबंधीत महाराष्ट्र सायबर वा तत्सम विभाग यांचेकडे विचारणा करुन आदेश /परिपत्रक उपलब्ध असल्यास पुरविण्यात यावे अथवा तसा लेखी अभिलेख नसल्यास अपीलकर्ता यांना १५ दिवसाचे आत कळविण्यात यावा, असा आदेश पारीत करण्यात आला.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलकर्ता उपस्थित राहून त्यांनी आयोगासमक्ष कथन केले की, माहिती अर्जानुसार मागितलेली माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झाली नाही. आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांचेतर्फे प्रतिनिधी म्हणून सहायक पोलीस निरीक्षक, श्री. युवराज उईके व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे प्रतिनिधी म्हणून सहायक पोलीस निरिक्षक, श्री. सौरभ घरडे उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष स्पष्ट केले की, अपिलकर्ता यांना मागितलेल्या एकुण ३ मुद्दयांच्या माहितीबाबत अवगत करण्यात आले आहे. अपिलकर्ता यांनी मागितलेली मुद्दा क्र. १ च्या माहितीबाबत वरिष्ठांचे आदेशाने देण्याचे अधिकार असून अशा प्रकारचे आदेशाची प्रत कार्यालयीन अभिलेखावर उपलबध नाही, असे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. तसेच मुद्दा क्र. २ व ३ बाबतची माहिती कलम ८(१)(त्र) अन्वये सदरची माहिती नाकारण्यात येत आहे, असे कळविले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थीस पुनश्च: मुद्दा क्र. १ बाबत सदर माहिती अभिलेखावर उपलब्ध नाही, याबाबत दिनांक २८.०३.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

६. **निष्कर्ष —**

उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, अपिलकर्ता यांनी माहिती अर्जानुसार मागितलेली मुद्दा क्र. २ व ३ बाबतची माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असून जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ८(१)(त्र) नुसार नाकारलेली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असून त्यांचे निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. मात्र, अर्जात नमुद केलेली मुद्दा क्र. १ ची माहिती अभिलेखावर उपलब्ध असल्यास ती देणे अभिप्रेत आहे. अथवा उपलब्ध नसल्यास त्याबाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर देणे अपेक्षीत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या मुद्दा क्र. १ च्या माहिती संदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोच देय डाकेने विनामुल्य पुरवावी तसेच जी माहिती उपलब्ध नाही. त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपीलार्थी यांना पाठवावे.

२. वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★ सत्यमेव जयते

(भुपेंद्र गुरव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १८.१२.२०२४**

जावक क्रमांक 947 दिनांक 3 MAR 2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर